# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकाचे कार्यालय
म. जो. फुले भवन,
विद्यानगरी, कलीना,
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई -४०००९८

क्र. परीक्षा / प.नि./ ६४४ /२०१२

परिपत्रकः-

**ई-सुविधा प्रणाली २०१३: Camp for Correction / Modification in Pre-Exam Student Data**

प्राचार्य,

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालये आणि प्राध्यापक नि-संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था यांना कळविण्यात येते की, मार्च २०१३ परीक्षेचे फॉर्म भरते वेळी महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांकडून झालेल्या चूका दुरुस्तीसाठी मुंबई विद्यापीठाने वेगवेगळया ठिकाणी शिबीर आयोजित केलेले आहे. या शिबिरासाठी सर्व महाविद्यालयांच्या कर्मचार्यांनी (ज्यांनी मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटीची ऑनलाईन प्रणालीवर स्वतः काम केले आहे) सक्रीय भाग घेऊन आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या माहिती मधील जर त्रूटी असतील तर त्या दुरुस्त करून घ्याव्यात.

मार्च २०१३ परीक्षेसाठी महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटी ऑनलाईन पोर्टल मध्ये Regular Module (For Fresher Student) आणि Repeater Module (Ex-Student & Never Appeared Student) मधून विद्यार्थ्यांचे परीक्षेचे अर्ज भरून विद्यार्थ्यांची माहिती Inward केलेली आहे. Confirmed केल्याशिवाय माहिती Inward करू शकत नाहीत. आणि Confirmed केल्यामुळे महाविद्यालयांना ती माहिती Edit करण्याची Facility नाही. तरीही काही ठिकाणी विद्यार्थीच्या माहितीत किंवा अभ्यासक्रम (Paper Selection) याच्या तपशिला मध्ये चूका राहिल्या असल्याची शक्यता आहे. म्हणूनच विद्यापीठाने अशा चुकांच्या दुरुस्तीसाठी विशेष शिबीर आयोजित केले आहे. या शिबिरात येण्या-अगोदर महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटी ची ऑनलाईन प्रणाली मध्ये लॉगिन करून सर्व विद्यार्थ्यांची माहिती तपासून पहावी.

**Regular Module (For Fresher Student) साठी खालील माहिती तपासून पहावी:**

1. First, Middle and Last Name of the student
2. Mother's Name
3. Name as printed on previous statement of marks of the student
4. Name in vernacular language (Marathi)
5. Latest Photograph of the student
6. Paper Change Cases (Subject Change Cases)

वरील तपशीलात काही बदल करायचा असल्यास महाविद्यालयांनी आपल्या मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटीच्या पोर्टलवर लॉगिन करून ज्या ज्या तपशिला मध्ये बदल करायचा आहे त्यासाठी Student Profile Correction Request Post करावी. हे कस करायचं या संबधीचे Student Profile Correction Request Process चे Presentation मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटीच्या पोर्टल वर http://mum.digitaluniversity.ac/downloads/Student%20Profile%20Correction%20Process.pdf uploaded केलेले आहे.

दि. १ जून २०१२ पासून दि. २६ डिसेंबर २०१२ पर्यंतच्या सर्व Student Profile Correction Request Process केलेल्या आहेत. तरी ही पहिल्यांदा महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगिन मध्ये विद्यार्थ्यांची माहिती बघूनच त्यात जे काय ते बदल करावेत.

**Repeater Module (Ex-Student & Never Appeared Student) साठी खालील माहिती तपासून पहावी:**

1. First, Middle and Last Name of the student
2. Mother's Name
3. Name as printed on previous statement of marks of the student
4. Name in vernacular language (Marathi)
5. Latest Photograph of the student
6. Paper Change Cases (Subject Change Cases)

Repeater Module मधून भरलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा परीक्षेचा अर्ज तपासून त्याच्या तपशिला मध्ये काही बदल करायचा असल्यास Correction Request Post करण्याची सुविधा नाही. अपेक्षित चुकांची दुरुस्ती किवा तपशीलातील बदल यांची यादी तयार करून यादीसह विद्यापीठाच्या शिबिरात हजर रहावे.

Fresher Student मध्ये Post झालेल्या Correction Request व Repeater Student बाबतीत वरील प्रमाणे बनवलेली यादी बघून शिबीरा मध्ये विद्यापीठाचे अधिकारी संबंधीत बदल करतील. या शिबिराची महाविद्यालय निहाय यादी मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटीच्या पोर्टलवर उपलब्ध आहे.
http://mum.digitaluniversity.ac/downloads/List%20of%20College%20for%20Process%20Student%20Data.pdf

तरी आपणास विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयासाठी निर्देशित तारखेला आणि वेळेला संबंधीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच वरील प्रमाणे सर्व माहिती घेऊन हजर राहणे गरजेचे आहे. या शिबिरात आपल्या महाविद्यालयातील कर्मचारी गैरहजर राहिल्यास आपल्या महाविद्यालयांनी मुंबई विद्यापीठाच्या डिजीटल युनिव्हर्सिटीच्या पोर्टल वरील महाविद्यालयाच्या लॉगिन मधून विद्यार्थ्यांचा भरलेला तपशील बदलला जाणार नाही आणि त्यात काही चूका किंवा त्रूटी राहिल्यास आपले महाविद्यालयच जबाबदार राहील याची नोंद असावी.

**या शिबीरा नंतर कोणत्याही प्रकारचा बदल विद्यापीठाकडून केला जाणार नाही याची सुद्धा नोंद घ्यावी.**

(दीपक गे. वसावे)
परीक्षा नियंत्रक,
परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०००९८

दि. २८ डिसेंबर २०१२

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालये आणि प्राध्यापक नि-संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था
२. मा. स्था. परीक्षा नियंत्रक यांचे स्वीय सहाय्यक